**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांकः24.09.2025** **वारःबुधवार**

---

**ठळक बातम्या**

**. शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यात राज्य सरकार कुठेही कमी पडणार नाही – मुख्यमंत्र्यांची ग्वाही**

**. 71 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण, राष्ट्रपतींकडून श्यामची आई चित्रपटाचा गौरवपूर्ण उल्लेख**

**. राज्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती, जनजीवन विस्कळीत**

**आणि**

**. या आठवड्याच्या शेवटी पुन्हा अतीवृष्टीचा हवामान विभागाचा इशारा**

**आता सविस्तर बातम्या**

**मुख्यमंत्री**

अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे शेती आणि जनावरांचं जिथं नुकसान झालं आहे तिथं आवश्यक त्या ठिकाणी केंद्र सरकारकडे मदतीचा प्रस्ताव पाठवण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं. मंत्रीमंडळ बैठकीत पूरस्थितीचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते. राज्यानं तातडीनं मदत देणं सुरू केलं आहे. केंद्राची मदत मिळेलच, पण शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा

देण्यासाठी राज्य सरकार कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. पुरामुळे स्थलांतरित व्हावं लागलेल्या नागरिकांसाठी सर्व व्यवस्था सरकार पुरवत आहे. सर्व पालकमंत्र्यांना पूरग्रस्त भागांना भेटी देण्याचे निर्देश दिले आहेत असं त्यांनी सांगितलं.

आतापर्यंत 31 लाख 64 हजार शेतकऱ्यांना 2 हजार 215 कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. यापैकी 1 हजार 829 कोटी रुपये जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आले असून येत्या 8 ते 10 दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा होतील. एकत्रित शासन आदेशाची वाट न पाहता, पंचनामे येतील तसे जीआर काढण्यात येत आहेत. मदतकार्य कुठेही थांबलेलं नाही असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं. मुख्यमंत्री आज पूरग्रस्त भागाची पाहणी करणार आहेत. दरम्यान राज्यात अतिवृष्टीमुळं 70 लाख एकराचं नुकसान झाल्याचा अंदाज कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केला आहे.

**काँग्रेस पत्रकार परिषद**

अतीवृष्टी आणि पुरामुळे राज्यभरात सुमारे 143 लाख हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. या पार्श्वभूमीवर सरकारनं शेतकऱ्यांना हेक्टरी सरसकट 50 हजार रुपये तातडीनं द्यावेत अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी काल केली. राज्य सरकार पोकळ आश्वासनं देत असल्याची टीका त्यांनी केली.

**मंत्रीमंडळनिर्णय**

विस्तारित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत रुग्णांच्या दाव्यापोटी मिळणाऱ्या रक्कमेचा विनियोग राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या राखीव निधीसाठी केला जाणार आहे. गरजू रुग्णांसाठी, 5 लाखांपेक्षा जास्त खर्च असणाऱ्या नऊ प्रकारच्या दुर्मिळ आजारांवरील खर्च या राखीव निधीतून करण्याच्या प्रस्तावाला काल मंत्रीमंडळानं मंजूरी दिली. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक रोड शाखेला कार्यालयासाठी सवलतीच्या दरात भूखंड देणे, सोलापुरात कुंभारी इथं बांधण्यात आलेल्या विडी कामगारांच्या घरांच्या

जागेवरील नोंदणी शुल्क आणि गृहनिर्माण संस्थेतील घरांवरील मुद्रांक शुल्कात सवलत देणे यासह अन्य काही प्रस्तावांना मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

**राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल वर्ष 2023 साठीचे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्रदान करण्यात आले. सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचा पुरस्कार मिळालेल्या श्यामची आई या चित्रपटाचा त्यांनी आपल्या भाषणात गौरवपूर्ण उल्लेख केला.

साउंड बाइट राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

या सोहळ्यात मराठी चित्रपटांनी आपली गुणवत्ता आणि वैविध्य सिद्ध करत राष्ट्रीय पातळीवर आपली छाप पाडली. पदार्पणातील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार आशीष भेंडे यांना आत्मपॅम्फ्लेट या चित्रपटासाठी मिळाला. तर सर्वोत्कृष्ट बाल चित्रपटाचा पुरस्कार नाळ 2 चित्रपटाला मिळाला. त्रिशा ठोसर, श्रीनिवास पोकळे, भार्गव जगताप आणि कबीर खंदारे यांना सर्वोत्कृष्ट बाल कलाकाराचा पुरस्कार मिळाला. चित्रपट क्षेत्रातला सर्वोच्च मानाचा दादासाहेब फाळके पुरस्कार मल्याळी अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मोहनलाल यांना प्रदान करण्यात आला.

**हे प्रादेशिक बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

सेवापर्व-कृत्रिम बुद्धीमत्ता

सेवा आणि सुशासनाचा मंत्र जपत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार सकारात्मक बदलांसाठी अथक प्रयत्न करत आहे. आज जाणून घेऊया भारताच्या एआय मिशनबाबत,

कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे शक्याशक्यतेच्या कल्पना पुन्हा मांडल्या जातील आणि आपलं जगणं, काम आणि विचार सगळंच बदलेल. कृत्रिम बुध्दीमत्तेचा विकास आणि अंगीकार यामध्ये भारत जगात आघाडीवर आहे. गेल्या वर्षी मार्च महिन्यात सरकारनं इंडिया एआय मिशनला मान्यता दिली. या अभियानाविषयी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले,

साउंड बाइट पंतप्रधान मोदी

मोठ्या प्रमाणात संगणन आणि नवोन्मेष केंद्रांची उभारणी, डेटासेटस विकसित करणे, स्टार्टअप्सना प्रोत्साहन तसंच कृत्रिम बुद्धीमत्तेचा सुरक्षित, विश्वासार्ह वापर या प्रमुख मुद्यांवर इंडिया एआय मिशन आधारित आहे. तंत्रज्ञानाचं लोकशाहीकरण करत या अभियानात नागरिकांना प्राधान्य देण्यात आलं आहे.

इंडिया एआय मिशन हा एक दृष्टीकोन आहे. भारताला जबाबदार आणि समावेशी कृत्रिम बुद्धीमत्तेच्या क्षेत्रात जगात आघाडीचं स्थान मिळवून देणं आणि 2047 पर्यंत विकसित भारत या स्वप्नाच्या पूर्ततेसाठी डिजिटल पाया भक्कम करणं हा या अभियानाचा उद्देश आहे.

**एआय मॉडेल**

कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा उपयोग करून सिंधुदुर्ग जिल्ह्यानं तयार केलेलं 'एआय सिंधुदुर्ग मॉडेल' आता राष्ट्रीय पातळीवर स्वीकारलं जाणार आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात नीती आयोगाचे सदस्य जिल्ह्याला भेट देऊन इथं विकसित करण्यात आलेल्या कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारित प्रारुपाचा प्रत्यक्ष अभ्यास करणार आहेत.

**पाऊस,पूर**

सोलापूर जिल्ह्यात सीना नदीला महापूर आला आहे. माढा, करमाळा, मोहोळ, पंढरपूर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर या तालुक्यातल्या अनेक गावांना पुराच्या पाण्यानं वेढलं आहे.  प्रशासनानं बचाव कार्यासाठी अन्य जिल्ह्यातून मनुष्यबळासह 11 बोटी मागवल्या असून आतापर्यंत 185 लोकांना पुरातून सुखरुप बाहेर काढलं आहे.

नंदूरबार जिल्ह्यात रंगावली नदीनं धोक्याची पातळी गाठली असून नदीकाठच्या 12 गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

परभणी जिल्ह्यात 50 महसूल मंडळांमध्ये अतीवृष्टी झाली आहे. परभणी जवळच्या करडगाव इथल्या पुलावरून पाणी वाहत असल्यानं 7 गावांचा संपर्क तुटला आहे.

लातूर जिल्ह्यात पुरामुळे जनजीवन विस्कळीत झालं आहे. अनेक ठिकाणी पूल पाण्याखाली गेल्यामुळे गावांचा संपर्क तुटला असून मालमत्ता, पशुधनाचंही नुकसान झालं आहे.

नांदेड जिल्ह्यातल्या विष्णूपुरी प्रकल्पातला विसर्ग आणखी वाढवावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नांदेडला पुन्हा पुराचा धोका निर्माण झाला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात जामखेड तालुक्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेत पीक, घरे, विहिरी, पशुधन यांचं मोठं नुकसान झालं असून ग्रामस्थांचं दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे.

राज्याच्य विविध भागात गेल्या काही दिवसात अतिवृष्टीमुळे झालेल्या विविध दुर्घटनांमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला असल्याचं शासनाच्या अहवालात म्हटलं आहे.

**हवामान**

राज्यात आजचा दिवसही पावसाचाच असेल. विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मरावाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांसह पावसाचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

दरम्यान, हवामान खात्यानं 27 आणि 28 सप्टेंबरला पुन्हा अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून, नागरिक आणि शेतकऱ्यांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असं आवाहन सरकारनं केलं आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **शेतकऱ्यांना तातडीचा दिलासा देण्यात राज्य सरकार कुठेही कमी पडणार नाही – मुख्यमंत्र्यांची ग्वाही**
- **71 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते वितरण, राष्ट्रपतींकडून श्यामची आई चित्रपटाचा गौरवपूर्ण उल्लेख**
- **राज्यात अनेक ठिकाणी पूरस्थिती, जनजीवन विस्कळीत**

**आणि**

- **या आठवड्याच्या शेवटी पुन्हा अतीवृष्टीचा हवामान विभागाचा इशारा**

# याबरोबरच आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.